# विधानसभा निवडणूक आणि नेतृत्व स्पर्धा

**श्री. अनिल विठ्ठल हंकारे,** राज्यशास्त्र विभाग, संशोधन विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

..............................................................................................................

विधानसभा निवडणूकीच्या तयारीला आता सारेच पक्ष नी अपक्ष लागले आहेत. २०१९ च्या २१ ऑक्टोबर २०१९ रोजी विधानसभेची निवडणूक लागली होती. विधानसभेच्या निवडणूका राज्याच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आहेत. आघाड्या तयार झाल्या होत्या, ज्या त्या वेळी आघाड्याच्या सरकारने जमेल तसा कारभारही चालवला पण यंदाच्या निवडणुकांत सरकार कोणाचे असेल?

कोणते नेतृत्व उदयास येईल? हाही प्रश्न पडतो. कारण नुकताच भाजपाच्या देवेंद्र फडणवीसांनी 'मीच पुन्हा येईन' हे विधान खरे करुन दाखवले. पण ते शिवसेनेशी युती करुन नव्हे तर राष्ट्रवादीच्या गोटातून अजित पवार यांना घेऊन मुख्यमंत्री झालेले फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार. या राजकीय नेतृत्वात हे सरकार टिकून राहते? की कोसळते? तथापि, हे सरकार चार दिवसातच कोसळलेले आपण पाहिले. पुढील सत्ता कशी असेल? हे येणारे दिवसचं ठरवतील.

विधानसभा निवडणूक –

भारतातील घटक राज्ये (महाराष्ट्र) यांच्यामधील कायदेमंडळाच्या कनिष्ठ ग्रहाला विधानसभा म्हणतात. भारतीय संविधानानुसार लोकशाहीची एक महत्वपूर्ण प्रक्रिया आहे ज्या द्वारे जनता आपल्या योग्य प्रतिनिधींना निवडून देते.

नेतृत्व –

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, नेतृत्व हा मुलभूत स्वरुपाचा घटक आहे आणि विधानसभेच्या नेतृत्वाचे सर्वदूर असे व्यापक संबंध दिसून येतात.

१.नेतृत्व ही सामूहिक स्वरुपाची संकल्पना आणून व्यक्तीच्या सामान्य हितसंबंधावर आधारित असते.

२.नेतृत्व स्वत:मध्येच एक प्रक्रिया असून ती व्यापक असा राजकीय प्रक्रियेचा एक महत्वपूर्ण भाग होय.

नेतृत्व स्पर्धेत खालील गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे.

१.पुढारी
२.अनुयायी
३.विशिष्ट परिस्थिती
४.संसूचन साधन
५.समूहाची उद्दिष्टे...

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१९ चे पक्षीय बलाबल व नेतृत्व पुढीलप्रमाणे –

| पक्षनिहाय जागांचे नेतृत्व | संख्या | पक्षनिहाय जागा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| भाजप | १०५ | भाजप | २५.७६ |
| शिवसेना | ५६ | शिवसेना | १६.४१ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस | ५४ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | १६.७२ |
| कॉंग्रेस | ४४ | कॉंग्रेस | १५.८५ |
| बहुजन विकास आघाडी | ०३ | मनसे | २.२५ |
| समाजवादी पक्ष | ०२ | नोटा | १.३५ |
| एम. आय. एम. | ०२ | एम. आय. एम. | १.३४ |
| प्रहार जनशक्ती पार्टी | ०२ | स्माजवादी पक्ष | ०.२२ |
| शेकाप | ०१ | बसप | ०.९२ |
| मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष | ०१ | अन्य | १८.६२ |
| मनसे | ०१ | | |
| क्रांतीकारी शेतकरी पार्टी | ०१ | | |
| जनसुराज्य शक्ती | ०१ | | |
| राष्ट्रीय समाज पार्टी | ०१ | | |
| स्वाभिमानी पक्ष | ०१ | | |

विधानसभा निवडणूक २०१९ चे परिणाम पाहण्यापूर्वी आपल्याला विधानसभा निवडणूक २०१४ चा ही विचार करणे गरजेचे आहे. तत्पूर्वी, त्याअगोदरचा थोडासा कालावधी म्हणजे सोळाव्या लोकसभा निवडणूकांच्या निकालांचे वर्णन ऐतिहासिकच करावे लागेल. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपचा ऐतिहासिक विजय आणि राहूल गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचा ऐतिहासिक पराभव म्हणूनच या नेतृत्व स्पर्धेकडे पहावे लागेल.

१९८८ नंतर म्हणजेच २५ वर्षानंतर भाजप या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्याने हे नेतृत्व अधिक चांगल्या प्रकारे ठळकपणे दिसून येते. आणि याचाच परिणाम २०१४ च्या निवडणूकीत भाजपाने १२२ जागा, तसेच २०१९ च्या निवडणूकीत भाजपाने १०५ जागा आपल्या शाबूत ठेवलेल्या दिसून येतात.

नेतृत्व स्पर्धेतील अपयश म्हणून काँग्रेस या जुन्या जाणत्या पक्षाला खालील गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील.

१.काँग्रेस विरोधातील असंतोष ओळखण्यात काँग्रेस कमी पडली.

२.नरेंद्र मोदी विरुद्ध राहूल गांधी हे नेतृत्वाच्या स्पर्धेत राहूल मागे पडले. याचा परिणाम संपूर्ण विधानसभेत दिसून येतो.

३.केवळ उदारीकरणाची धोरणं आणि कल्याणकारी योजनांचा मारा करणं पुरेसं नाही, तर मूलभूत बदलांकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे.

४.नरेंद्र मोदी राष्ट्रीयत्वेचे नेतृत्वाने भारतीय राजकारण केंद्रीकरण रचनाकडे ठेवतील.

५.महाराष्ट्र विधानसभेच्या दृष्टीने काँग्रेसला धोक्याचा इशारा.

६.महाराष्ट्राबरोबर, हरियाणा राज्यातही आघाडीला हे धोके जाणवू लागले आहेत.

हे झाले काँग्रेस अन् भाजप पक्षाबद्दल २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत भाजप १२२ शिवसेना ६३ यांचे युतीचे सरकार स्थापले गेले होते. पण महाराष्ट्राच्या विधानसभेत २०१९ मध्ये भाजप व शिवसेनेमध्ये नेतृत्व (मुख्यमंत्री पदाच्या ) स्पर्धेच्या आहारी गेलेल्या दोन्ही पक्षांमुळे युती होऊ शकली नाही. म्हणून भाजपच्या नेतृत्वाकडून नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील वगैरे नेत्यांनी राष्ट्रवादीला म्हणजेच अजित पवारांना व काही आमदारांना एकत्र घेवून आपले मुख्यमंत्री पद शाबूत ठेवले आहे. अन् राष्ट्रवादीला उपमुख्यमंत्रीपद देवून सत्तानाट्याला कलाटणी दिलेली दिसते.

राष्ट्रवादी काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते अजित पवार यांनी बंड करुन राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली. अजितदादांचे हे नेतृत्वगुण राजकारणाला पूर्णपणे कलाटणी दिल्याने सत्तासंघर्ष तीव्र झाला आहे. आता पुढील काही दिवसांत सत्ता कोणाची हे नेतृत्व गुणच आपल्याला सांगू शकेल? भाजप आणि शिवसेना यांचे काही केल्या जमेना म्हणून तर भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर जाण्याचे ठरवले आहे. याला अजित पवार सहमती देतात तर शरद पवार यांचा तुरतास विरोध आहे. पण शरद पवार हे किंगच बनलेले दिसून येतात. अन् भाजपला अतिफाजील आत्मविश्वासामुळे सत्ता स्थापन केल्याच्या परिणामाला सत्ता स्थापनेपासून दूरच रहावे लागले.

उद्धव ठाकरे यांचा अट्टहास ह्या राजकारणाला वेगळी दिशा देणारा ठरला. आदित्य ठाकरे यांनी युवा नेतृत्व करुन अनेक ठिकाणी पक्षबांधणी चांगल्या प्रकारे केलेली आहे. यामध्ये सामना हे दैनिक, तसेच शिवसेना १९६६ पासूनचे नेतृत्वही लक्षात ठेवावे लागेल. संजय राऊत यांचा स्पष्टवक्तेपणा चांगले नेतृत्व करतो की सत्ता स्थापनेसाठी दूर पळावे लागेल काय? याचेही भय वाटत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, काँग्रेस पक्ष यांच्यासमवेत शिवसेना राज्यपालांच्याकडे जावून आपले पक्षीय बलाबल साध्य करणार तेवढ्यातचं राष्ट्रवादीच्या फुटीर गटाने राजकारणचं बदलवून टाकलेले संपूर्ण राज्याने पाहिले आहे. पण भाजप +राष्ट्रवादी = सत्ता हे समीकरणं शेवटी जुळून न येणारे दिसले. सेनेचा मुख्यमंत्री असेही राजकारण पहायला मिळाले. हाही नेतृत्वाचा वेगळाच प्रकार पहायला मिळाला.

विधानसभा निवडणुकीत महत्वाच्या पक्षांचे नेतृत्व कशा पद्धतीने बदलत गेले आहे त्याचे स्पष्टीकरण—

काँग्रेस :—ब्रिटिश राजवटीच्या काळातील हा जुना जाणता पक्ष एलेन ह्युम, दादाभाई नौरोजी, दिनशावाचा यांनी स्थापना केलेली होती. काँग्रेस पक्षांनी अनेक चांगले निर्णय ह्या महाराष्ट्र राज्याला दिले. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्कात समानता व जागतिक शांती नांदावी असा उद्देश काँग्रेस पक्षाचा आहे. स्थापनापासून त्यांची अधिवेशने यातून त्यांचे अनेक ध्येय धोरणे साध्य केलेली दिसून येतात. स्वातंर्त्यपूर्वकाळातील धोरणे, संस्थानाबाबतची धोरणे, पक्षांतर्गत संरचना, काँग्रेस वर्कींग कमीटिचे कार्य, प्रदेश काँग्रेस कमीटिचे कार्य हे सर्व काँग्रेस पक्षाचे नेतृत्व प्रभावीपणे अंर्तमुख करते. आणि अत्यंत महत्वाची बाब अशी केंद्रिय निवडणूक विभाग केवळ काँग्रेस असा एकमेव पक्ष आहे की ज्यामध्ये केंद्रिय निवडणूक विभाग नावाचा स्वायत्य विभाग आहे. पक्षार्तंगत निवडणूका झाल्यास त्या निष्पक्ष होतील याची खबरदारी घेतो. पृथ्वीराज चव्हाण, ऐ. के. अँटनी, अब्दुल रहमान आंतुले, इंदिरा गांधी, महात्मा गांधी, राजीव गांधी, राहूल गांधी, सोनिया गांधी, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, बाळगंगाधर टिळक, दिग्विजय सिंह, शिला दिक्षित, पी. व्ही. नरसिंहराव, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक, जवाहरलाल नेहरु, मोतीलाल नेहरु, दादाभाई नौरोजी, वल्लभभाई पटेल, वसंतदादा पाटील, नेताजी बोस, मनमोहन सिंग, प्रणव मुखर्जी, नारायण राणे, लालबहादूर शास्त्री, भजनलाल, भुपेद्रसिंह हुड्डा, अशोक गेहलोत, शंकरसिंह वाघेला, अजित ज्योगी, गिरीधर गमांग, मुकुल वासनिक, विलासराव देशमुख, सुशिलकुमार शिंदे, राजेश पायलट, सचिन पायलट, माधवराव शिंदे, ज्योतिरादित्य शिंदे, बाळासाहेब व्हीखे पाटील, पतंगराव कदम, विश्वजित कदम यासारखे अनेक नेते काँगेस पक्षाने

घडवलेले आहेत. यातील काही नेते दुस—या पक्षाकडे वळलेले दिसून येतात. पण मुख्य भुमिका काँग्रेसची अत्यंत चांगल्या प्रकारे दिसून येते. युवकांची काँग्रेस, नॅशनल स्टुडंटस् युनियन ऑफ इंडिया, ऑल इंडिया काँग्रेस समिती यांचेही नेतृत्व काँग्रेस पक्षाला उभारी देणारे आहेत. अनेक भ्रष्टाचारी कार्ये, अनेक घोटाळे यामुळे काँग्रेस पक्षाचे महत्त्व कमी झालेले दिसून येते. विधानसभा निवडणूका २०१९ मध्ये काँग्रेस पक्षाचे ४४, २०१४ मध्ये ४१तर २००९ मध्ये ६२ एवढ्या सीट्स त्यांच्या आलेल्या होत्या. काँग्रेस पक्षाला दिवसेंदिवस पक्षबल कमीच दिसून येत आहे. म्हणून काँग्रेस पक्षाने नरेंद्र मोदीसारखा एक नवीन चेहरा समाजाला दाखवणे गरजेचे आहे असे वाटते. सद्ध्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप—सेनेचे जमेना म्हणून सत्ता करण्यासाठी राष्ट्रवादी आणि सेना याच्याबरोबर काँग्रेस ही त्यात ओढली गेलेली आहे आणि या सर्वांचा सुत्रधार नेता म्हणून शरद पवार यांचेच नाव घ्यावे लागेल.

भाजप—सेना यांची युती राष्ट्रवादी कॉग्रेस आणि काँग्रेस यांची आघाडी आणि इतर सर्व छोटे पक्ष यांचा सत्तासंघर्ष सर्व महाराष्ट्राने पाहिलेला आहे. बहुजन विकास आघाडी, समाजवादी पक्ष, प्रहार जन शक्ती पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, क्रांतीकारी शेतकरी पार्टी, जनसुराज्य शक्ती, राष्ट्रीय समाज पार्टी, स्वाभिमानी पक्ष व अपक्ष यांचेही नेतृत्व लक्षात घ्यावे लागेल. हे जरी छोटे पक्ष असले तरी, इथून पुढच्या काळात एकादा पक्ष अजून पक्षबल वाढवू शकतो, पण सत्तेच्या राजकारणांमध्ये यातील काही पक्ष सत्ताधा—यांशी मिळतात. किंवा विरोधी पक्षात बसून चांगले प्रभावीपणे नेतृत्व करतात. हाही भाग निराळाच मानावा लागेल.

राष्ट्रवादी काँग्रेस—१९५६ साली शालेय जिवनात गोवामुक्ती सत्याग्रहाला पाठिंबा दर्शविण्यासाठी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला या घटनेनंतर शरद पवार यांची राजकीय जिवनाची सुरवात झाली. कॉलेजमध्ये असताना विद्यार्थी संघटनेचे नेते म्हणून त्यांनी काम पाहिले. एकदा त्यांनी समारंभासाठी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांना आमंत्रित केले, त्यावेळी पवारांनी केलेल्या भाषणामुळे यशवंतराव चव्हाण अतिशय प्रभावित झाले. आणि वयाच्या २४ व्या वर्षीच चव्हाणांनी शरद पवारांना महाराष्ट्र युवक काँग्रेसचे अध्यक्ष केले. यशवंतराव चव्हाणांचा राजकीय वारसदार म्हणून शरद पवार यांच्याकडे पाहिले जावू लागले. त्यानंतर अनेक देशांना भेटी देवून राजकारणाचा अभ्यास, राजकीय पक्ष, पक्ष बांधणीचा अभ्यास त्यांना खूप जवळून करता आला. सर्वप्रथम १९६७ मध्ये बारामती मधून विधानसभेला ते निवडून आले. १९७२, १९७८ मध्ये ही ते निवडून आले. यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर वसंतरावदादा पाटील हेही पवारांचे मार्गदर्शक होते, पण त्यावेळी एक वसंतदादाच्या सरकारवर शरदपवारांनी १२ आमदार फोडून विरोधी पक्षाबरोबर हातमिळवणी केली आणि वसंतदादांचे सरकार पाडले. पवारांनी माझ्या पाठीत खंजीर खुपसला असा शेरा वसंतदादा पाटलांनी त्यावेळी दिलेला होता. आणि त्याचवेळी शरद पवार हे महाराष्ट्राचे सर्वांत तरुण मुख्यमंत्री झाले. १९९९ साली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. कृषीमंत्री, अन्न व सार्वजनिक वितरण ही खातीही त्यांना देण्यात आलेली होती. क्रिकेटमध्ये सुद्धा भारतीय क्रिकेट नियमकाचे अध्यक्ष म्हणून तसेच अनेक शिक्षण संस्थामधील सहभागही शरद पवारांचे नेतृत्व गुण अधिक प्रभावी असल्याचे दाखवून देतो. त्यांना पद्मविभूषण हा पुरस्कार सुद्धा मिळालेला आहे. सुप्रिया सुळे, अजित पवार, आर. आर. आबा पाटील, जयंत पाटील, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे यांच्या सारखे अनेक दिग्गज नेते आपल्या पक्षकार्यात त्यांनी घडवलेले आहेत. अर्थमंत्री, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, ऊर्जा मंत्री, नियोजन मंत्री अशी महत्त्वाच्या पदावर अत्यंत चांगल्या पद्धतीने नेतृत्व करुन महाराष्ट्र राज्याला अनेक महत्वाचे निर्णय सोपवलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रात तर २०१९ च्या विधानसभेत त्यांनी ५० टक्के पेक्षा जास्त उमेदवार जिंकून दाखवलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रात तर त्यांचे नेतृत्व अत्यंत प्रभावी आहे असेच मानावे लागेल.

शिवसेना :—शिवसेनेची स्थापना १९ जून १९६६ रोजी प्रादेशिक राजकीय पक्ष प्रभोधनकार ठाकरे यांनी करुन संघटनेचे प्रथम प्रमुख पद बाळासाहेब ठाकरे यांना देण्यात आले. अन् त्यावेळी १८ सदस्य हे काँग्रेसमधून आलेले होते. समाजसुधारकांची समृद्ध परंपरा असलेला महाराष्ट्र पुरोगामी आहे, पण मराठी माणूस मागे राहिला आहे. महाराष्ट्रात अनेक सुविधा, उद्योग, कारखाने आहेत, पण मराठी तरुण बेरोजगार, गरीब अशा परिस्थितीत आहे हे बाळासाहेबांनी जाणले होते. म्हणून त्यांनी शिवतीर्थावरुन शिवसेना हा पक्ष पुढे चालविला. वकतृत्वाबरोबरच लेखन करण्याची कला सुद्धा बाळासाहेबांच्या अंगी व्यक्तिमहत्वात होती. सामना हे केवळ शिवसेनेचे मुखपत्र नसून महाराष्ट्रीय माणसाचा जिवंत हुंकार होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सामनातील अग्रलेखाची वाट संपूर्ण महाराष्ट्र पहात असे, आणि आज सुद्धा सामना हे वृत्तपत्र मुख्य पत्राात गणले जाते. बाँबस्फोट, देशविघातक कृत्ये घडविणा—या धर्मांधाना या देशात राहण्याचा अधिकार नाही या स्पष्ट रोखठोक भुमिकेमुळेच त्यांना हिंदूहृद्यसम्राट ही उपाधी प्राप्त झाली होती. हिंदूहृद्यसम्राट सरसेनापती या नावानेही त्यांना ओळखले जात होते. झुंका—भाकर केंद्र योजना. वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपटपट्टीवासीयांना घरे, मुंबई—पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई असा बदल अशा अनेक प्रकल्पांची मुळ संकल्पना ही बाळासाहेबांचीच. संस्कृती विघातक उत्सवांना विरोध, परप्रांतीयांच्या तसेच बांगलादेशीयांना विरोध करणे हे मूळचे बाळासाहेबांचे तत्व होते. जातीपातीचे राजकारण, सहकारी संस्था, साखर कारखाने स्थापन करुन केलेले सत्ताकारण, कुटिल राजकारण असे महाराष्ट्रातील परंपरागत राजकारण या ठाकरेंनी केले नाहीत. तरुणांची मने ओळखून, त्यांची नाडी ओळखून ते विचार एकमेवद्वितीय अशा वक्तृत्वशैलीच्या साहाय्याने मांडणे, आक्रमक संघटनेच्या साहाय्याने आंदोलन करणे हे बाळासाहेबांचे कार्य नेतृत्व गुण प्रभावी असल्याचे दर्शवून

देतात. मनोहर जोशी. प्रमोद नवलकर, सुधीर जोशी, मधूकर सरपोतदार, छगन भुजबळ, सुरेश प्रभू, अनंत दिघे, दत्ताजी नलावडे असे अनेक नेते बाळासाहेबांनी घडवले. शिवसेनेचे सद्ध्याचे कार्यप्रमुख उद्धव ठाकरे, मनसेचे राज ठाकरे यांची जडणघडण यामध्ये बाळासाहेब ठाकरे यांचा मोलाचा वाटा आहे. मार्मिक या साप्ताहिकातूनही मराठी माणसावर ज्या ज्या वेळी अन्याय झाला, त्या त्या वेळी या प्रश्नाला त्यामधून वाचा फोडण्यात आलेली आहे. आतातर शिवसेनेमध्ये उद्धव ठाकरे यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे हेही युवा केंद्रित संघटनेचे प्रमुख आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुका २०१९ मध्ये वरळी मधून बहुमतांनी निवडून आलेले आहेत. शिवसेना विधानसभा २००९ मध्ये ४४, २०१४ मध्ये ६३ तर २०१९ मध्ये ५४ येवढ्या जागा मिळवलेल्या आहेत. भाजप–शिवसेना यांच्या नेतृत्वगुणांमुळे २०१४ आणि २०१९ चा विचार करता जागा थोड्या कमी झालेल्या दिसून येतात. सर्व जनमत म्हणत असले तरी आयाराम–गयाराम मुळे शिवसेना आणि भाजप यांची संख्या बल कमी झालेले आहे, पण काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील भ्रष्टाचार, अनेक घोटाळे, आघाडीच्या उमेदवारांच्या मनात निवडून न येण्याची भीती असल्यामुळेच ते भाजप–शिवसेना या पक्षाकडे गेलेले आहेत. तथापि, या कारणांमुळे भाजप–सेनेला फटकाच बसलेला दिसून येतो. भाजप–सेनेची युती तुटल्यामुळे फाजील आत्मविश्वासामुळे भाजप–सेना हे दूरदूरच राहिलेले दिसून आले. भाजपने राष्ट्रवादीच्या गोटातील अजित पवार यांना सोबत घेवून सरकार स्थापन करण्याचा केविलवाणा प्रयत्न केलेला दिसून येतो, पण चौथ्या दिवशीच हे सरकार कोसळले आणि पुढे शिवसेना–राष्ट्रवादी–काँग्रेस या महाआघाडीची सत्ता स्थापन झाली. तर अशा पद्धतीचे सत्तेचे राजकारण आपणांस पहायला मिळाले.

भाजप –१९८० साली स्थापन झालेला भाजप पक्ष हिंदूत्व, सामाजिकता, समान नागरिकत्व/समानता या राजकीय तत्वांवर आधारित आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत हा पक्ष जुळलेला दिसून येतो. सन २०१४ पासून या पक्षाचे नेतृत्व अधिक व्यापक झालेले दिसून येते. १९८० साली स्थापन झालेला पक्ष असला तरी भारतीय जनसंघाचे काम १९५१ पासूनच सुरू असलेले दिसून येते. जवाहरलाल नेहरू यांच्याकडून पाकिस्तानचे होणारे लांगूनचालन रोखणे संघाचे महत्वाचे उद्दिष्ट होते. हिंदूत्ववादी संघटना म्हणून भाजप ओळखला जातो. दिनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस, योगी आदित्यनाथ, नितीन गडकरी, या सारखे असे दिग्गज लोक त्यांनी तयार केले.

राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रवाद, लोकशाही, गांधीजींनी सुचवलेला समाजवाद, सेक्युलॅरिझम आणि मुल्याधिष्टित राजकारण यासाठी भाजप राजकारणात सक्रीय असलेला दिसून येतो. नॅशनल कॉन्सिल नावाची कार्यकारणी, नॅशनल एक्झिक्युटिव्ह, सेंट्रल इलेक्शन कमिशन, डिसीप्लीनरी कमिटी आणि नॅशनल सेल्स् या विविध मार्गातून नेतृत्व अधिक प्रभावी झाल्याचे दिसून येते. तथापि, खंडणीखोरीचा गुन्हा, जमीन गैरव्यवहार, जमीन खरेदीमधील भ्रष्टाचार, क्रिडा घोटाळा, अनेक प्रकारचे आर्थिक घोटाळे, सहकारी बॅंकेचा घोटाळा, झोपडी पुनर्वसन कामामध्ये केलेला घोटाळा अशा प्रकारचे अनेक भ्रष्ट मार्गाने केलेला कारभारही भाजपला मागे पाडण्यास कारणीभूत ठरतो. पण तरीही भाजपने सध्याच्या राजकारणात अनेक चांगली कामे केली आहेत. म्हणून २०१४ मध्ये १२२ तर विधानसभा २०१९ मध्ये १०५ अशा सिट्स मिळालेल्या आहेत. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मगरूरीपणा आणि फाजील आत्मविश्वास यामुळे सत्ता स्थापनेपासून दूरच रहावे लागले. असे हे नेतृत्व सर्व महाराष्ट्राने नुकतेच पाहिले आहे.

मनसे –मनसे नेतृत्व महाराष्ट्र राज्य व मराठी भाषा, महाराष्ट्र संबंधीचे ज्ञान व महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास या गोष्टीचा विचार हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तत्वांचा मूळ गाभा आहे. राज ठाकरे यांनी ९ मार्च २००६ रोजी या पक्षाची स्थापना केली. हा एक प्रादेशिक/राज्यस्तरीय राजकीय पक्ष आहे. या पक्षाचे ध्येय आणि धोरणानुसार नेतृत्व गुण अतिशय चांगले आहेत असे वाटते. तथापि विधानसभा निवडणूक २००९ साली १३ इतक्या जागा मिळाल्या आणि २०१४ साली ०१ जागा मिळाली आणि २०१९ साली सुद्धा केवळ ०१ जागेवरच समाधान मानावे लागले. राजठाकरे हे महाराष्ट्रातील राजकारणे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाच्या राजकीय पक्षाचे अध्यक्ष व संस्थापक आहेत. सन २००८ साली यांनी केलेल्या अनेक आंदोलनात मुंबई व परिसरात नविन आलेल्या बिहारी वउत्तरप्रदेशांचे लोंढे यांना विरोध करत चांगले नेतृत्व केले होते, पण तेकायम वादाच्या भोव–यांत राहिलेले आहेत. महाराष्ट्रात सर्व नेत्यांपैकी गुगल वर सर्वात जास्त सर्च होणारे नेते म्हणून सुद्धा इंटरनेटच्या जगतात त्यांचा दबदबा दिसून येतो. अन् ते तरुण लोकांमध्ये जास्त लोकप्रिय आहेत. महाराष्ट्रातील मराठी नागरिक जास्तीत जास्त राज ठाकरे कडून अपेक्षा ठेवतात. अनेक त्यांच्या सभांना गर्दी झालेली दिसून येते. पण मतामध्ये त्यांच्या नेतृत्वाला फारसा वाव मिळाला नाही. तरीही त्यांची कामगिरी आणि नेतृत्व वाखाणण्याजोगे आहे. ठाकरे कुटूंबात जन्मल्यामुळे बालपणापासूनच बाळासाहेब ठाकरे यांचे मार्गदर्शन आणि राजकारणाचे धडे त्यांनी गिरवलेले आहेत. ते अजूनही बाळासाहेब ठाकरेंना आपले दैवतंच मानतात. पण पुढे काही कालावधीनंतर बाळासाहेब ठाकरेंचे उत्तराधिकारी म्हणून राज ठाकरे यांच्याकडेच कार्यकर्ते पहात होते. पणबाळासाहेबांचे पुत्र उद्धव ठाकरे यांना कार्याध्यक्षपदी नियुक्ती केली. तथापि राज ठाकरे समर्थकामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष झाकोळला अन् त्यांनी शिवसेना सोडून आपला मनसे हा पक्ष स्थापन केला. नेतृत्व करत असताना मुंबई मध्ये येणा–या परप्रांतीयविषयी राज ठाकरे यांनी अधिक लक्ष वेधले त्यांच्यावर शाब्दीक हल्ला चढविला आणि राष्ट्रीय नेत्यावरही सडकून टिका केली. हे परप्रांतीय महाराष्ट्रात येऊन मराठी भाषा शिकत नाहीत, उलट यांना हिंदी

भाषेतच बोलावे लागते, असा सर्वच महाराष्ट्राचा अनुभव आहे. इथे मराठी भाषेची आस्मिता जागृत करण्याचा प्रयत्न राज ठाकरेंनी केला आहे. जपान, फ्रान्स, जर्मनी या देशातील तसेच तमिळनाडू, पश्चिम बंगाल या ठिकाणी गेले तर तेथील स्थानिक भाषाच शिकावी लागते, पण हे परप्रांतीय येऊन मराठी भाषेला कमी लेखतात, त्यांच्या राज्यातील कुप्रसिद्ध गुंडशाही येथे आणतात. अशा पद्धतीची भाषणे, टिका, मुलाखती यांच्यातून स्पष्ट केले आहे. पण सद्ध्याचे राजकारण पाहता त्यांच्या नेतृत्व गुणाला फारसा वाव मिळत नसल्याचे दिसून येते. त्यांनी जरा हिंसक आणि प्रक्षोभक वातावरणाने त्यांना रत्नागिरी येथे अटक ही झालेली होती, आणि हिंदी माध्यामांनी त्यांच्यावर तडाडून टिका केली. राज ठाकरे यांचे म्हणणे कांही जणांना पटते तर कांही जणांना नाही. राज ठाकरे यांचे प्रचार सभेत मुद्दे विकासाचे असतात पण जनता मात्र अल्प काळच हे लक्षात ठेवते जणू काही मनोरंजनाचाच कार्यक्रम चालू आहे. भारतातील सर्वात सुंदर असा विकासाचा आराखडा निर्माण करण्याचे काम ही ह्यांच्याच नावावर नमूद आहे. महाराष्ट्राच्या ब्लू प्रिंट मधील विविध निर्णय हे नरेंद्र मोदी सरकारने अस्तितवात आणले यावरुन राज ठाकरे यांचे नेतृत्व अतिशय प्रभावी असल्याचे दिसून येते आणि पुढील काळातही राज ठाकरे यांचे नेतृत्व आणखी वाढत राहील असे दिसते.

राज ठाकरे यांचे नेतृत्व —

१.जेट एअरवेज मधून जेव्हा अनेक मराठी कामगारांना कामावरुन कमी केले आणि ते सर्व कामगार राज ठाकरे यांना भेटले. व राज ठाकरेंनी त्या कामगारांना त्यांचा हक्क मिळवून त्यांना कामावर परत रुजू करुन घ्यायला लावले.

२.रेल्वे भरतीमध्ये परप्रांतीय आंदोलन तर राज ठाकरेंच्या यशस्वी आंदोलनापैकी एक आहे. महाराष्ट्रातल्या अनेक तरुण विद्यार्थ्यांना रेल्वे मध्ये अनेक विभागामध्ये नोकरी मिळालेल्या आहेत.

३.महाराष्ट्रात शेतकरी वर्ग जास्त प्रमाणात आहे. शेतकर—यांच्या दृष्टीकोनातून राज ठाकरे यांनी व्यापकतेने लक्ष दिले तर राज ठाकरे यांची ताकद आणखी वाढू शकेल. तरी राज ठाकरे यांनी शेतकरी वर्गाकडे अधिक व्यापकतेने लक्ष द्यावे असे वाटते.

राजकारणातील सद्यास्थितीचे नेतृत्व :—महाराष्ट्राच्या विधानसभेत असाच काही प्रकार घडत आहे. अजूनही महाराष्ट्राचे सरकार कोणते येणार? हे काही समजू शकत नाही. कारण शिवसेना या हिंदुत्ववादी पक्षाने राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या धर्मनिरपेक्ष पक्षाशी युती करण्याचा प्रयत्न चालविला आहे. आणि मुख्यमंत्री पद शिवसेनेसही मिळू शकेल यात शंका नाहीच. सध्याच्या सरकारने फडणवीस आणि अजित पवार यांनी बहुमत सिद्ध केल्यास ते सरकार स्थिर होण्याची शक्यता आहे, अन् तसे न झाल्यास पुन्हा शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस अशा विचारसरणीसह महाआघाडीकडे सत्ता जाण्याची शक्यता आहे. असे वाटते.यापूर्वी देशाच्या राजकारणात असले नेतृत्व झालेले आपणांस पाहायला मिळेल. पण विधानसभेच्या निवडणूकीत हे प्रथमच पहायला मिळाले. विधानसभा निवडणूकीमध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांचे आपण नेतृत्व स्पर्धा पाहिलीच आहे.

याच बरोबर विधानसभेत बाकीचे काही पक्ष नेतृत्व करत असतात. बहूजन विकास आघाडी, समाजवादी पक्ष, एम. आय. एम., प्रहार जनशक्ती पार्टी, शेकाप, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, क्रांतीकारी शेतकरी पार्टी, जनसुराज्य शक्ती, राष्ट्रीय समाज पार्टी, स्वाभिमानी पक्ष व अपक्षांचे नेतृत्वही लक्षात घ्यावे लागेल.

विधानसभेच्या निवडणूकीत काही पक्ष जातीचे नेतृत्व, शेतकरी संबंधीत नेतृत्व, मराठी भाषेचे महत्व, कामगारांचे नेतृत्व, मराठी राष्ट्रवाद, दलितांचा समाजवाद, शेतक—यांची संघटन. इत्यादी ब—याचप्रकारचे नेतृत्वही लक्षात घ्यावे लागेल. तथापि, ह्या सर्व पक्षांना काही मोजक्या .जागांवर आपले यश आलेले आहे. तेव्हा त्यांनी सत्तास्थापनेच्या वेळी आपल्या विचारसरणीसह त्या त्या गटाला मिळूनच नेतृत्व करतात. अथवा विरोधी गटात तरी सामील होवून नेतृत्व करतात. राष्ट्रवादी काँग्रस अन् काँग्रेसने मोदींची लाट नाही असे ठामपणे सांगत मोदींच्या आव्हानाकडे दुर्लक्ष केले. पण नंतर नेतृत्व बदललेले दिसून येते.

महायुती (भाजप, शिवसेना, रिपाई (आ) स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाजपक्ष,शिवसंग्राम)केवळ पक्षीय आघाडीच नव्हती, तर ती एक सामाजिक (शेतकरी), ओबीसी, दलित, मराठा आघाडी बनून ती मतांमध्ये परिवर्तीत झाली. शिवाय भाजपने मराठा आरक्षणास पाठिंबा दिल्याने समाजानेही त्यांचे नेतृत्व मान्य केलेले आहे.

भाजपच्या काळामध्ये केंद्रीय नेतृत्व, मोदी + शहा = सत्ता, फडणविस सर्वात तरुण मुख्यमंत्री, आणि चंद्रकांत दादा पाटील यांची साथ आणि राष्ट्रीय ते राज्यपातळी पर्यंत नेतृत्व गुण भाजपला पुढे घेऊन जायला तयार झालेले होते. अयोध्या प्रकरण, मराठा आरक्षण, मेगा भरती, ३७० वे कलम रद्द (जम्मू काश्मिर) हाही भाग राज्य पातळीवर काही लोकांनी उचलून धरला होता. कारण राष्ट्रीय नेतृत्वगुणही याला कारणीभूत ठरले. काँग्रेस—राष्ट्रवादी यांनी वरील कोणताच हिंदूत्वाचा मुद्दा आपल्या राजकारणात घेतला नाही त्याचा फटका त्यांना बसलेला दिसून येतो.

निष्कर्ष :—

१.विधानसभा निवडणूकांमध्ये भाजपच्या यशाला मर्यादा पडल्याचे दिसून येते. मागच्या (२०१४) विधानसभा निवडणुकीच्या परिणामांशी या परिणामांत (२०१९) तुलना केली असता महाराष्ट्रात भाजप व शिवसेना या दोन्ही पक्षांना फटका बसल्याचे दिसून येते.

२. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात नसती तरी धीर टिकवून

ठेवली आहे तसे नेतृत्वात दिसून येते. याचे मुख्य कारण ज्येष्ठ नेते शरद पवारांनाचा जाते.

३. याऊलट राहूल गांधी, सोनिया गांधी, प्रियंका गांधी यांचेही नेतृत्व अपयशाला गेलेले दिसून येते. भूपिंदरसिंह हुडा जे की हरियाणाचे मुख्यमंत्री आहेत. यांच्या सारख्या स्थानिक ज्येष्ठ नेत्याला नेतृत्वगुणांची संधी दिली असती तर यापेक्षा वेगळे चित्र पाहायला मिळाले असते. जसे की भाजप मध्ये मोदींचे नाव पुढे आलेले आहे. तशाच पद्धतीचे ज्येष्ठांचेनेतृत्व घेणे गरजेचे होते.

४. शिवसेना व भाजप यांनी युतीचे सरकार २०१४पासून चालवले होते. पण त्यांनी एकोप्यांनी प्रशासन चालवले आहे असे दिसून येत नाही.

५. भाजपाने आयात केलेल्याअथवा आघाडीकडून पळून आलेल्या उमेदवारीमुळे १२२ वरुन

१०५ एवढी संख्या घटली आहेहेही पक्षाने जाणून घ्यावे.

६. आम्ही तुम्हाला आणखी एक संधी देण्यास तयार आहोत पण तुम्ही कर्तव्यपूर्तीत हयगय करता कामा नये, असा संदेश सत्ताधा—यांना मतदारांनी दिलेला आहे.

७. शेवटी अंतस्थ हेतू सत्ता मिळवणे हाच असतो हेही सत्ताधा—यांनी नेतृत्वाच्या विविध गुणांतून दर्शवून दिलेले आहे. हेच स्पष्ट होते.

समारोह — राजकारण हे व्यवहारात सत्तेचा वाद असतो अन् तिथे असते बुद्धिची कुरघोडी या सर्वांमध्ये कोण अग्रेसर होईल त्याचे नेतृत्व सर्वोत्म असते असे मानले जाते. सद्ध्याच्या राजकारणाचा विचार करता महायुतीला मतदारांनी कौल दिलेला आहे, पण बुद्धी जिवेच्या जोरामुळे शिवसेना—भाजप ही युती कायमपणे टिकू शकली नाही. सत्तेच्या वाटपावरून युतीमध्ये हमरीतुमरी झाली आणि हा वाद अंर्तगत झाला असे म्हणता येणार नाही. युती किंवा आघाडी किंवा महाआघाडी करताना किंवा त्यांच्यामधील सत्ता ताब्यात घेण्यापूर्वी कधीही जाहीरपणे चर्चा केली जात नाही. म्हणून जनतेसमोर त्याची सौदेबाजीही होत नाही. जे काही चालते ते पडद्यामागून चालत असते. आणि सर्व ठरल्यानंतर हेच राजकारणी सौदेबाजी आपल्या स्थरावर कशी यशस्वी केली हे ते जाहिरपणे जनहितार्थ करित असतात. त्याची स्तुतीसुमने उधळीत असतात. शिवसेनेने आपल्यालाच मुख्यमंत्रीपद हवे आणि तशी युती होताना ठरवले होते अशा प्रकारचा दावा त्यांनी केलेला होता तथापि, भाजपने असा कोणताच दावा आम्ही केलेला नव्हता म्हणून शिवसेनेला फेटाळून लावले. आणि युद्ध पेटले.

देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देतेवेळी पत्रकार परिषदेत सांगितले की शिवसेनेने अगोदर काहीही सांगितले नाही. आणि नंतर सत्तेसाठी ते भाजप पक्षाशी अडेलतट्टूपणाने वागले. ठराविक दिवसातच बहुमत मिळवलेल्या पक्षाने राज्यपालाकडे जावून सत्तेचा दावा करणे गरजेचे असते. भाजप कडे १०५ आमदार, शिवसेनेशी काही जमत नसल्याने त्यांनी राज्यपालाकडे आमचे संख्याबळ नाही असेच जाहिर केले. म्हणून राज्यपालांनी पर्याय शोधणे सुरू केले. सद्ध्याच्या आघाडीला विरोधी पक्षात बसण्यासाठी जनतेने कौल दिला होता. पण युतीचे चिन्ह बिनसल्यामुळे कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना यांची सत्ता होण्यासाठी अधिकचा वेळ लागला. राष्ट्रपती राजवट लागू व्हायलाच नको होती. असे वाटते याऊलट भाजप पक्ष संयम ठेवून शिवसेनेशी पुन्हा जुळेल का? या अपेक्षेने वाट पहात बसलेला होता. तथापि, सेनेने संवाद बंद केल्याने भाजपकडे अन्य कोणतेही नेतृत्व नसल्याने सत्तेच्या जुळणीतून आपला पाय काढता घ्यावा लागला. कॉंग्रेस—राष्ट्रवादी—शिवसेना यांच्या लागोपाठ मिंटिंगावर मिंटिंग घेवूनही वेळेत काहीच ठरले नाही. म्हणजेच तिन्ही पक्षात अजूनही सत्तेबाबत काहीच एकमत झालेले नाही. शेवटी पक्ष हा सत्ता मिळवण्यासाठी काहीही करायला तयार होतातच हे यावरून सिद्ध होते.

**संदर्भः**

1.**पळशीकर सुहास व सुहास कुलकर्णी,२००७, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष समकालीन प्रकाशन,पुणे.**

2.राज्याच्या राजकारणाची नवीन रूपरेषासंपादकीय डॉ.प्रकाश पवार.

3. **पळशीकर सुहास व नितीन बिरमल, संपा(२००४, २००७), महाराष्ट्राचे राजकारण, राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे**

4. **दै. लोकमत सोलापूर, २४ ऑक्टोबर २०१९**